## निशाण क्र. ९६ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी याने प्रतिवादी क्र. १६ हिचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी दिला आहे. प्रतिवादी यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे.

२. वादी याच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. १६ सुगंधा सुरेशपाडावे ही दिनांक ११/१०/२०११ रोजी म्हणजेच दावा दाखल करण्यापुर्वी मुंबई येथे मयत झाली आहे. वादी हे गावी वास्तव्यास असल्याने व प्रतिवादी क्र. १ ही मुंबई येथे मयत झाल्याने तिच्या मृत्यूची कल्पना वादीस मिळाली नाही. अलीकडे वादीस त्याचे नातेवाईकांमार्फत प्रतिवादी क्र. १६ मयत असल्याची माहिती मिळाली. दावा हा वाटपाचा असल्यामुळे प्रतिवादी क्र. १६ हिच्या वारसांना याकामी प्रतिवादी क्र. १७ ते १९ असे पक्षकार करणे आवश्यक आहे. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १६ च्या वारसांचे हितसंबंध गुंतले असल्याने त्याना पक्षकार न केल्यास दाव्यास उणिव भासणार आहे. तरी प्रतिवादी क्र. १६ च्या वारसांना पक्षकार म्हणून सामिल करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी यांनी प्रतिवादी क्र. १६ हिचे सर्व वारसांना याकामी सामिल केलेले नाही. अर्ज अपुर्ण व खोटा आहे. सबब, अर्ज फेटाळण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

३. वादीने नि. ९८ च्या यादीसोबत प्रतिवादी क्र. १६ हिचा मृत्यू दाखला हजर केला आहे. सदर मृत्यू दाखल्याचे अवलोकन करता प्रतिवादी क्र. १६ ही दिनांक ११/१०/२०११ रोजी मुंबई येथे मयत झाली आहे. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिनांक १२/१२/२०१८ रोजी दाखल केला आहे. वादीने प्रस्तुतचा अर्ज ५ वर्षे ११ महिने इतक्या विलंबाने दाखल केला आहे. वादीने अर्जासोबत दावा प्रतिवादी क्र. १६ विरुध्द अबेट झालेबाबत व वारस दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी अर्ज दाखल केलेले नाहीत. प्रस्तुतचा दावा हा वाटपाचा असून प्रतिवादी क्र. १६ चे वारस याकामी आवश्यक पक्षकार आहेत. वादी व प्रतिवादी यांच्यामधील मुळ वादाचे निराकरण एकाच दावेचे कामी करणेसाठी प्रतिवादी क्र. १६ च्या वारसांना

याकामी प्रतिवादी क्र. १६अ ते १६क असे पक्षकार करणे आवश्यक आहे. मा. झालेल्या विलंबाबाबत वादीवर खर्च बसवणे यथोचित होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रतिवादी यांना खर्चाची रक्कम रुपये १०००/— द्यावी व योग्य मुदतीत प्रतिवादी क्र. १६ चे वारस प्रतिवादी क्र. १६अ ते १६क असे नमूद करुन योग्य ती दुरुस्ती करावी.

( सलीम अ जमादार )
न्यायाधिकारी,
ग्रामन्यायालय, वैभववाडी

दि. १३/२/२०१९